# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सामनगांव रोड नाशिक-रोड ,नाशिक

☎ :0253/2461479, Fax : 2455301 ई-मेल:- ronashik.dte@gmail.com.

www.dtensk.org


---

जा.क्र.तंशि/विकाना/तांशा/२०११/ 1572 दिनांक :- 26 SEP 2011

प्रति,

प्राचार्य,

शासकीय ,अशासकीय अनुदानित तसेच विना अनुदानित,

अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था,

नाशिक विभाग

**विषय :-** **<u>प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका प्रवेश २०११-१२</u>**
**शासकीय तंत्रनिकेतनामध्ये अल्पसंख्याकासाठी विशेष प्रवेश फेरी**

**संदर्भ :-** संचालनालयाचे अधिसूचना क्र. १०/अल्पसंख्याक/प्रवेश /२०११/७६१
दिनांक १६.९.२०११

उपरोक्त विषयांस अनुसरून शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून काही शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये अल्पसंख्याकासाठी काही शाखाकरीता दुसरी पाळी सुरू करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र शासनाने मुस्लीम, बौध्द,शिख,ख्रिश्चन,पारशी, जैन या समुदायाला अल्पसंख्याक म्हणून घोषित केलेले आहे. सदर तंत्रनिकेतनांमध्ये वरील समुदायाच्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी ७० टक्के जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत तसेच खुला प्रवर्ग व राखील प्रवर्ग यामधील विद्यार्थ्यांसाठी ३० टक्के जागा राखून ठेवण्यात आलेल्या आहेत अशा प्रकारची अधिसूचना संचालनालयाच्या संदर्भिय पत्रानुसार काढण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, या अधिसूचनेत नमूद केलेल्या संस्थामध्ये ज्या विद्यार्थ्यांनां प्रवेश मिळाला आहे. अशा विद्यार्थ्यांना पूर्वी प्रवेश घेतलेल्या संस्थेतून त्याची मूळ कागदपत्रे परत करण्यात येत नाहीत. तरी संबंधित विदयार्थ्याचे शैक्षणिक हित लक्षात घेता याबाबत नियमानुसार योग्य ती कार्यवाही आपल्या स्तरावर करण्यात यावी.

तसेच याबाबत भविष्यात काही अडचणी उदभवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्रमुख या नात्याने आपली राहील याची नोंद घ्यावी.

(दि.रा.नंदनवार)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक

प्रत - प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नाशिक यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी
२/- त्यांनी सदरचे पत्र या विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.